दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ४९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१३ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात कोरोनाच्या आज ५८ हजार ८०५ रुग्णांना डिस्चार्ज

**दै.रायगड नगरी । मुंबई**


गेल्या २४ तासांत राज्यात ४६ हजार ७८१ नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. काल निदान झालेल्या रुग्णांची संख्या ४० हजार ९५६ इतकी होती. कालच्या तुलनेत नव्या रुग्णसंख्येत काहीशी वाढ झाली असून असून हा फरक ५ हजार ८२५ इतका आहे. तर आज एकूण ५८ हजार ८०५ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. काल ही संख्या ७१ हजार ९६६ इतकी होती. याबरोबरच राज्यातील सक्रिय रुग्णांची संख्या ५ लाख ४६ हजार १२९ वर जाऊन पोहचली आहे. आज राज्यात एकूण ८१६ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. काल ही संख्या ७९३ इतकी होती. सध्या राज्यातील मृत्यूदर १.४९ टक्के इतका आहे. याबरोबर राज्यात आज ५८ हजार ८०५ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत, तर आतापर्यंत एकूण ४६ लाख ०० हजार १९६ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ८८.०१ टक्क्यांवर पोहोचले आहे.

# ३१ मे पर्यंत लॉकडाऊन कायम राहणार; मुख्यमंत्री घेणार अंतिम निर्णय : आरोग्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील करोना स्थिती लक्षात घेऊन लॉकडाऊन ३१ मे पर्यंत वाढवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत सर्वच मंत्र्यांनी आग्रह धरला. बैठकीनंतर तशी माहिती आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिली असून लॉकडाऊन वाढवण्याची अधिकृत घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे करतील असे त्यांनी स्पष्ट केले. लोकल प्रवासाबाबत सध्या जे निर्बंध आहेत ते १५ मे नंतरही कायम राहणार आहेत. त्यात कोणताही सवलत देण्याचा विचार नसल्याचेही टोपे यांनी स्पष्ट केले.

राज्यात लॉकडाऊनचे निर्बंध कठोर केल्यानंतर त्याचे सकारात्मक परिणाम दिसत आहेत. वाढत्या करोना रुग्णसंख्येला ब्रेक लावण्यात बऱ्याच प्रमाण यश आले आहे. मात्र, अजूनही दैनंदिन रुग्णसंख्या मोठी असल्याने लॉकडाऊन १५ मे नंतरही वाढवण्यात यावा असे मत मंत्रिमंडळ बैठकीत बहुतांश मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांपुढे मांडले. त्याबाबत मुख्यमंत्रीही सकारात्मक असून यावर अंतिम निर्णय तेच घेतील, असे राजेश टोपे यांनी



पत्रकाराशी बोलताना स्पष्ट केले.

राज्यात करोनाच्या ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या सात लाखांच्या जवळ पोहचली होती. निर्बंध कठोर केल्यानंतर हा आकडा आता कमी होत आहे. सध्या ही रुग्णसंख्या पावणेपाच लाखांपर्यंत खाली आली आहे. मुख्य म्हणजे देशाचा रुग्णवाढीचा जो दर सध्या आहे त्याच्या निम्मा दर महाराष्ट्रात आहे. ज्या राज्यात रुग्णवाढ कमी होत आहे त्यात महाराष्ट्राचा समावेश आहे. ३६ राज्यांमध्ये आपण आता तिसाव्या स्थानी आहोत. ही दिलासा देणारी बाब आहे. मात्र, बेसावध राहून चालणार नाही. राज्यातील काही जिल्ह्यांत रुग्णसंख्या कमी होत असताना काही जिल्ह्यात रुग्ण वाढत आहेत. त्यात म्युकरमायकोसिसचे रुग्णही वाढू लागले आहेत. त्यामुळेच राज्यात आणखी किमान १५ दिवस लॉकडाऊन वाढवला पाहिजे, असे सर्वांना वाटत असल्याचेही टोपे यांनी पुढे नमूद केले. लॉकडाऊनबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर नव्याने गाइडलाइन्स जारी करण्यात येतील, असे स्पष्ट करतानाच लोकल सेवेबाबत सध्या जे निर्बंध आहेत ते पुढेही कायम राहतील. त्यात काही सवलत दिली जाईल असे वाटत नाही, असे टोपे म्हणाले.

## संक्षिप्त...

### राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांच्यावर गोळीबार

**दै.रायगड नगरी । पुणे**

पिंपरी चिंचवडमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांच्यावर गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. बनसोडे यांच्या दिशेने तीन गोळ्या झाडण्यात आल्या. मात्र सुदैवाने एकही गोळी त्यांना लागली नाही आणि ते सध्या सुखरूप आहेत.

अँथोनी नावाच्या ठेकेदाराच्या सुपरवायझरने हा गोळीबार केल्याचं समोर आलं आहे. प्राथमिक माहितीत गोळीबार करणाऱ्या व्यक्तीचं नाव तानाजी पवार असं आहे. पिंपरी पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आहे. हा संपूर्ण प्रकार बनसोडे यांच्या कार्यलयाच्या समोर घडल्याची माहिती पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश यांनी दिली आहे. पण गोळीबार का केला? हे अद्याप समजलेलं नाही. मीच पवारला बोलवलं होतं, अशी माहिती पोलिसांना अण्णा बनसोडे यांनी दिली. पोलीस अधिक तपास करत आहेत. अटकेत असलेले तानाजी पवार हे सीआरपीएफचे निवृत्त जवान आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली.

हल्ला झाल्यानंतर अण्णा बनसोडे यांनी पहिली प्रतिक्रिया देताना म्हटलं की; ठेकेदार अँथोनी यांचा सुपरवायझर तानाजी पवारला गेल्या काही दिवसांपासून आम्ही संपर्क करत होतो. दोन मुलांना कामाला लावण्यासंदर्भात मी संपर्क करत होतो. माझ्या पीएने तानाजी पवारला फोन केला होता. मात्र त्याने बोलताना अरेरावी केली. त्यामुळे मी त्याला बोलावून घेतलं होतं. त्याला समजावून सांगितलं. मात्र त्याने बाहेर जाऊन थेट गोळीबार केला. आमच्या काही वादावादी झाली नाही, मात्र पवारने वाद घातला. तानाजी पवारने गोळीबार केल्यानंतर इथे उपस्थित असलेल्या मुलाने त्याला खाली पाडलं.

## खाजगी रुग्णालयांना कोरोना लस देण्यास परवानगी ; आयुक्त सुधाकर देशमुख

### कोविन ॲपवर नोंदणी करून खाजगी रुग्णालयात लसीकरण करता येणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनावर मात करण्यासाठी लसीकरणावर भर दिला जात असून पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्वच नागरिकांचे लसीकरण व्हावे, यासाठी महापालिका आवश्यक ते सर्व नियोजन करीत आहे. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सध्या एकूण ८ ठिकाणी ४५ वर्षाहून अधिक वयोगटातील व्यक्तींना लसीकरणाचा कार्यक्रम राबविला जात आहे. तर ३ केंद्रावर १८ ते ४४ वयोगटातील व्यक्तींना लसीकरण केले जात आहे. नवीन निश्चित केलेल्या धोरणा नुसार दिनांक १ मे २०२१ पासून खाजगी लसीकरण केंद्रांना शासनाच्या धोरणानुसार स्वतः उत्पादकाकडून लस खरेदी करून लसीकरण कार्यक्रम कोविन पोर्टलचा वापर करून राबविण्यास मान्यता दिली आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी



महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली लसीकरणाचे नागरी टास्क फोर्स असून मंगळवारी (दि.११ मे) झालेल्या टास्क फोर्सच्या बैठकीमध्ये अपोलो रुग्णालयाला त्यांच्या मागणीचा विचार करून सरस्वती कॉलेज खारघर येथे खाजगी लसीकरण केंद्र (पीसीव्हीसी) सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. लवकरच या ठिकाणी उचित शुल्क घेऊन लसीकरण कार्यक्रम राबविला जाईल.

१ मे पूर्वी सुरु असलेल्या परंतु सध्या बंद आसलेल्या १३ खाजगी रुग्णालयांना त्यांनी स्वतः लस खरेदी करून त्यांच्या केंद्रांमध्ये लसीकरण सुरू करण्यास सुध्दा मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर लसीकरण ठिकाणी संबंधित रुग्णालयांनी स्वतः उत्पादकाकडून लस खरेदी करून कोविन ॲपवर नोंदणी करून लसीकरण करता येईल.

## तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेत तांत्रिक बिघाड

### तब्बल ५ दिवस १७ गाव-वाड्यांना पाणी नाही

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुका टँकर मुक्त आसल्याचे शासन सांगत असले तरी तालुक्यातील अनेक पाणी पुरवठा योजना सदोष आहेत. त्यामुळे तोंडसुरे प्रादेशिक नळ योजनेतील १७ गाव-वाड्यांना पाणी नाही. अशी स्थिती तालुक्यातील अन्य गावातून सुद्धा आहे. टँकरमुक्त म्हसळा तालुक्यातील म्हसळा शहरासह १७ गाव-वाड्यासह ३० % गावे टंचाईला तोंड देत आहेत.



तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेत तोंडसुरे, वरवठणे, आगरवाडा, पेडांबे, रेवली, बनोटी, खारगाव खुर्द व सकलप अशी ८गावे व  बाऊल कोंड, पेडांबे हरीजन वाडी आणि त्यांच्या बौध्दवाडया, आदीवासी वाडया आहेत. या सार्वांची लोकसंख्या सुमारे ८ हजार आहे.

२००१ साली ही नळ पाणी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणने पूर्ण केली तर या योजनेची देखभाल दुरुस्ती जिल्हा परिषदेचा ग्रा.पा. पुरवठा विभाग करीत आहे. मागील काही वर्षाचा अनुभव पहाता एप्रिल-मे या टंचाई च्या काळातच अनेक वेळा, सदोष पाईप लाईन, साठवण टाक्या,पाणी पंप तर धरणाच्या दुरुस्ती यामुळे दरवर्षी पाणी पुरवठा खंडीत का होतो या स्थानीकांच्या प्रश्नाला शासन मात्र अनुत्तरीत किंवा टोलवाटोलवी का? अशीही गावा-गावांतून चर्चा आहे.

## १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांचे लसीकरण तूर्तास बंद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मोठा गाजावाजा करत केंद्र सरकारने १ मेपासून देशा-तील १८ ते ४४ या वयोगटातील नागरिकांच्या लसीकरणास सुरुवात करण्याची घोषणा केली होती. मात्र लसींच्या टंचाईमुळे या वयोगटातील नागरिकांचे लसीकरण सुरुवातीपासूनच अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडले होते. दरम्यान, लसींच्या कमी पुरवठ्यामुळे आता राज्य सरकारने १८ ते ४४ या वयोगटातील नागरिकांच्या लसीकरणाबाबत मोठा निर्णय घेतला आहे.

कोरोनाविरोधातील लसीच्या तुटवड्यामुळे १८ ते ४४ या वयोगटातील नागरिकांचे तूर्तास लसीकरण केले जाणार नाही, अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर दिली आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना राजेश टोपे यांनी सांगितले की, लसीच्या तुटवड्यामुळे १८ ते ४४ या वयोगटातील नारगिकांचे लसीकरण तूर्त न करणाचा निर्णय सरकारने घेतला आहे.

सध्या ज्या व्यक्तींनी कोरोनाची लस घेतली आहेत त्यांना दुसरा डोस मिळणे आवश्यक आहे. त्याचे कारण म्हणजे दुसरा डोस न घेतल्यात पहिल्यांदा घेतलेल्या लसीची उपयुक्तता राहणार नाही. त्यामुळे याआधीच कोरोनाविरोधातील लसीचा पहिला डोस घेतलेल्यांचे लसीकरण करणे गजरेचे आहे.

## सिडकोच्या सहकार्याने करण्यात येणार पाम बीच मार्गाचे विस्तारीकरण

### वाहतूक कोंडीवर मात करण्याकरिता महत्त्वाचे पाऊल

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडकोच्या सहकार्याने नवी मुंबई महानगरपालिका घणसोली ते ऐरोली दरम्यान पाम बीच मार्गाचे विस्तारीकरण करणार असून या प्रकल्पाकरिता आर्थिक योगदान देण्याचा निर्णयही सिडको महामंडळाने घेतला आहे. पाम बीच मार्गाच्या विस्तारीकरणाकरिता सिडको आणि नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे अनुक्रमे ५०:५० या प्रमाणात खर्चाचा भार उचलण्यात येणार असून सिडकोतर्फे सदर कामाकरिता कमाल रु. १२५ कोटींचा खर्च उचलण्यात येणार आहे. मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व मा. नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर प्रकल्प सिडकोतर्फे साकारण्यात येत आहे.

सिडकोतर्फे सीबीडी बेलापूर मार्गे ऐरोली ते मुलुंड-ठाणे-मुंबई यांना जोडणाऱ्या २१.१२ कि.मी. लांबीच्या पाम बीच मार्गाचे नियोजन करण्यात आले होते. अनेक लहान मोठे पूल उभारण्यात येऊन सदर मार्ग २००४ मध्ये कार्यान्वित झाला. पाम बीच मार्गामुळे शीव-पनवेल महामार्ग आणि



ठाणे-बेलापूर मार्गाव्यतिरिक्त एक पर्यायी मार्ग सीबीडी बेलापूर ते ठाणे/मुंबई दरम्यानच्या वाहतुकीस उपलब्ध झाला. नियोजित पाम बीच मार्गापैकी १९.२० कि.मी. च्या मार्गाचे काम पूर्ण झाले असून सीबीडी बेलापूर ते वाशी दरम्यान हा मार्ग पूर्णत: तर वाशी ते घणसोली दरम्यान अंशत: कार्यान्वित आहे. पूर्ण झालेला पाम बीच मार्ग नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आला असून संबंधित महानगरपालिकेकडून त्याची देखभाल करण्यात येते. सद्यस्थितीत पाम बीच मार्गाच्या वाशी ते ऐरोली दरम्यान १.९४ कि.मी. च्या टप्प्याचे काम अद्याप बाकी आहे. यामुळे पाम बीच मार्गावरून जाणाऱ्या वाहनांना ऐरोली-मुलुंड पुलावर थेट प्रवेश उपलब्ध नाही.

पाम बीच मार्गाचे एरोली ते घणसोली दरम्यानचे प्रस्तावित विस्तारीकरण हा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रादेशिक संधानतेचाही (रिजनल कनेक्टिव्हिटी) एक भाग आहे. तसेच ..../२

पाम बीच मार्गाच्या घणसोली ते ऐरोली दरम्यान करण्यात येणाऱ्या विस्तारीकरणामुळे वाहतूक कोंडीवर मात करण्यासह सीबीडी बेलापूर ते मुंबई व ठाणे दरम्यानची वाहतूक अधिक सुलभ होऊन प्रवाशांना त्याचा फायदा होणार आहे. या प्रकल्पाला चालना देण्याच्या उद्देशाने सिडकोने प्रकल्प खर्चाचा भार अंशत: उचलून नवी मुंबई महानगरपालिकेस सहकार्य करण्याचा निर्णय घेतला आहे.

**डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## चिरनेर हायस्कूल जवळील पुल धोकादायक अवस्थेत

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

गव्हाणफाटा-चिरनेर या राज्य महामार्ग क्रमांक १०४ वरील चिरनेर नाक्यावरील पुल (साकव) धोकादायक अवस्थेत असून तो अवजड वाहनांच्या वर्दळीमूळे कधीही पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. जर हा पुल पडला तर उरण पुर्व भागातील लोकांचा संपर्क तुटणार आहे. तसेच अलिबाग, गोवा दिशेला जाणारी वाहतूक बंद पडणार आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने या पुलाच्या दुरूस्तीकडे आणि नुतनीकरणाचे काम हात घ्यावे अशी मागणी युवा नेते राजेंद्र भगत तसेच चिरनेर गावातील ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

उरण तालुक्यातील फुंडे येथे सिडकोचा एक पुल कोसळून एक व्यक्ती ठार झाल्याची दुदैवी घटना नूकताच




घडली होती त्यानंतर सिडकोने आपल्या हद्दीतील पुलांची तपासणी केली. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्याप अशा धोकादायक पुलांची माहिती घेतली नाही. राज्य महामार्ग क्रमांक १०४ वर प्रवाशी वाहनांसाठी साकवांची (पुलांची) उभारणी करण्यात आली आहे. मात्र मागील वर्षापासून मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक सदर रस्त्यावरुन सुरू आहे त्यामुळे हा खिळखिळा झालेला पुल केव्हाही कोसळण्याची शक्यता आहे. या पुलाच्या दोन्ही भागाचे कठडे कोसळले असून पुलातून लोखंडी शिगा देखिल बाहेर आल्या आहेत. ..../२

## रोह्यात मृत्यूदर वाढला ; दुसऱ्या लाटेने घेतले ७० हुन अधिक जणांचे बळी

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यात कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांचा आकडा एक हजारांच्या घरात पोहचला आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने घेतले ७० हुन अधिक जणांचे बळी घेतले असून एकूण १२६ जण मृत्यूमुखी पडले आहेत. गेल्या तीन दिवसांत २०० रुग्ण बरे झाले असून आजवर  एकूण ३६०३ रुग्ण बरे होऊन आपल्या घरी परतले असल्याची शासकीय आकडेवारी आहे.

रोहा तालुक्यात कोरोना दुसऱ्या लाटेने मृत्यूदरात मोठी वाढ झाली आहे, रुग्णांची संख्याही वाढती आहे. मात्र बरे होण्याचा प्रमाणही चांगले असून दि. १० ते १२ मे. दरम्यान तालुक्यात २०६ रुग्ण बरे झाले आहेत. रोहा तालुक्यात कोरोनाने अनेक दिग्गजांचे बळी घेतले असून असा नाही ज्यांचा कोणी नातेवाईक गेला नाही.



कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत रोहा एमआयडीसीतील कारखाने डेवन पासून जोमाने सुरू आहेत. सुरुवातीला लसीकरण ही मंद गतीने सुरू होते, रोहा शहर आणि तालुक्यातुन सुमारे २२ हजाराहून अधिक कामगार कर्मचारी एमआयडीसीतील विविध कारखान्यात दररोज ये-जा करीत असल्याने, कारखान्यात होणाऱ्या गर्दीने कोरोनाची दुसरी लाट तालुक्यात फोफावली गेली. ५० टक्के कामगार कपात करून कारखाने सुरू ठेवण्याच्या निर्णयाला कंपनी व्यवस्थापनांनी हरताळ फासल्याने तालुक्यात कोरोना रुग्णवाढीसाठी एमआयडीसी ही प्रमुख कारण ठरली असल्याचे तज्ञ मंडळी सांगत आहेत.

रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन रोह्याचे नगराध्यक्ष संतोष पोठफोडे यांनी रोहा शहर पाच दिवस लॉक आऊट केले आहे, मात्र शहरात सगळी दुकाने बंद असताना तालुक्यात बाकी सगळीकडे गावांमध्ये अगदी लग्न -हळदी दुकाने सर्व काही जोमाने सुरू आहेत, त्यामुळे रोहा बंद करून काहीच उपयोग नाही, तीन दिवसांचा रिपोर्ट पाहिला तर केवळ १५ टक्के रुग्ण रोहा शहरातील आहेत. तालुका प्रशासनाने रोहा तालुका बंद केला तरच लॉकडाउनचा काहीतरी उपयोग होईल असे दिसून येत आहेत.

लसीकरण केंद्र ज्येष्ठ ..../२

# ही तर लूटमार!

निवडणुका आल्या की तेवढ्यापुरते स्वस्ताईचे आभासी वातावरण तयार करायचे आणि एकदा मते पडली जुनाच करवाढीचा किंवा व्याजकपातीचा खाक्या पुढे चालू ठेवायचा, हा सगळ्या सरकारांचा आवडता खेळ आहे. पूर्वीची सरकारे आणि आत्ताचे मोदी सरकार यांच्यात यात काहीही फरक नाही. पहिल्यांदा लोकसभेची निवडणूक जिंकली तेव्हा प्रचार करताना नरेंद्र मोदी हे डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारने पेट्रोल–डिझेलच्या किमती आकाशाला नेऊन भिडवल्या, अशी टीका करीत असत. गेल्या सहा–सात वर्षांमध्ये आपल्या सरकारने या किमती किती वाढवल्या, याचे त्यांनी आत्मपरीक्षण केले तर त्यांना आपल्या प्रचारातील फोलपणा दिसून येईल. पाच प्रदेशांच्या निवडणुका होत होत्या, तेव्हा एरवी मोठ्या स्वायत्ततेच्या गप्पा मारणाऱ्या पेट्रोलियम कंपन्यांनी तब्बल १८ दिवस पेट्रोलच्या भावांना हात लावला नाही. आणि एकदा का निकाल लागले की याच कंपन्यांनी करोनाने आधीच गांजलेल्या नागरिकांचे लचके तोडायला पुन्हा सुरुवात केली. प्रत्येक राज्यातली कररचना भिन्न असली तरी या नव्या भाववाढीमुळे काही शहरांमधील पेट्रोलच्या भावाने शंभरीचा आकडा गाठला आहे. खरेतर, देशाची सारी अर्थव्यवस्था कमालीची संकटात सापडलेली असताना पेट्रोलियम कंपन्यांनी ग्राहकांची इतकी लूट करण्याचे काहीही कारण नव्हते. मात्र, पेट्रोल आणि डिझेलचे भाव वाढवले की हक्काची करवसुली कोणतीही विशेष धडपड न करता होत राहते. त्यातही, इंधन भाववाढ झाली की राज्यांनी केंद्र सरकारवर टीका करायची, हे ठरलेलेच असते. मात्र, देशातील एकही राज्य सरकार आपले कर कमी करून ग्राहकांना कधीही दिलासा देत नाही. कारण राज्य सरकारांनाही भाववाढ झाली की टक्केवारीच्या प्रमाणात वाढीव करसंकलन करता येतेच. तेव्हा परस्परांवर टीका करायची, हे सगळ्या राजकीय पक्षांचे नुसते दाखवायचे दात असतात. प्रत्यक्षात सगळ्यांनाच सामान्य नागरिकांना नागवायचे असते. पेट्रोल व डिझेलचा वापर हा भाज्या, दूध, किराणा तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीसाठी अपरिहार्य आहे. केवळ चैनीच्या गाड्या उडविणारेच पेट्रोल वापरत नाहीत. राज्य व केंद्र अशा दोन्ही सरकारांनी अनेक दशके सार्वजनिक वाहतुकीची विल्हेवाट लावली असल्याने मोठ्या तसेच छोट्या शहरांमधील लाखो नागरिकांना कामावर जाण्यासाठी किंवा कामे करण्यासाठी स्वत:चे वाहन वापरण्याला दुसरा कोणताही पर्याय नसतो. एखादा 'बेस्ट'चा अपवाद वगळला तर महाराष्ट्रातील कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्था सिटी बससेवा गंभीरपणे चालवत नाहीत. मग सामान्य नागरिकांनी करायचे काय? करोनाचे संकट असतानाही तेलकंपन्या सातत्याने इंधन दरवाढ करीत असताना केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी 'मग विकासासाठी पैसा नको का?' अशा शब्दांत तिचे समर्थन केले होते. केंद्र सरकारने कधीतरी अपवादाने केलेल्या करकपातीकडे बोट दाखवून त्यांनी 'आम्ही कर कमीही करतो' असेही म्हटले होते. प्रत्यक्षात, पेट्रोलियम कंपन्या जागतिक तेलभावांशी आपले भाव कधीही निगडीत ठेवत नाहीत. भारतातील करोनारुग्ण जसजसे वाढत होते; तसतसे जगातील तेलाचे भाव काही प्रमाणात कमी होत होते. भारत हा तेलाचा मोठा ग्राहक आहे आणि भारतीय अर्थव्यवस्था सुरळीत होत नाही, तोवर भारताची तेलाची गरज कमी राहणार. असे असूनही भारतीय पेट्रोलियम कंपन्या मात्र तेलखरेदीतला फायदा ग्राहकांपर्यंत नेण्यास नाखूष असतात. याचे एक कारण, सहसा ग्राहकांपर्यंत येत नाही. ते म्हणजे, त्यांना दरवर्षी केंद्र सरकारला प्रचंड नफा लाभांश रूपाने द्यायचा असतो. केंद्र सरकारने चालू आर्थिक वर्षासाठी सगळ्या सरकारी कंपन्यांसाठी ५० हजार कोटी रुपये लाभांशाचे लक्ष्य ठेवले आहे. यातला कमीत कमी ४० टक्के वाटा, हा सरकारी तेलकंपन्यांचा असतो. केंद्र सरकारचा इतका दबाव असेल तर तेलकंपन्या जगात तेलाचे भाव कितीही पडले तरी मूळ भाव कमी कसे करणार? अशा परिस्थितीत मूळ चढे भाव, केंद्राचे कर आणि राज्यांचे कर अशा तिहेरी कचाट्यात पेट्रोल व डिझेलचा ग्राहक सापडतो. अशी भाववाढ झाली की पाठोपाठ चलनवाढ आणि महागाईचे संकट बोकांडी बसतेच. भाजी, किराणा अशा चिजांची भाववाढ होते तेव्हा तिचा खरा फटका नेहेमीच कनिष्ठ मध्यमवर्ग आणि गरिबांना बसत असतो. त्यांचे मासिक अंदाजपत्रकच कोलमडून जाते. निदान करोना काळात तरी केंद्र सरकारने याचे भान ठेवायला हवे होते. वस्तू आणि सेवा कर म्हणजे जीएसटीची अर्थक्रांती घडविल्याची बढाई केंद्र सरकार नेहेमीच मारत असते. मग पेट्रोल आणि डिझेल यांचा समावेश केंद्र सरकार जीएसटीत का करीत नाही? यात राज्यांचेच नुकसान होईल, असा बचाव याबाबत केंद्र सरकारने केला होता. पण तेलच त्यात येणार नसेल तर जीएसटीला काय अर्थ राहिला? थोडक्यात, केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि तेलकंपन्या या साऱ्यांना मिळून सामान्य नागरिकांना वाट्टेल तेव्हा, वाट्टेल तसे लुटण्याचे एक हत्यार हातातून सोडायचे नाही. विक्रमी इंधनदर वाढीचा तोच दु:खद आणि संतापजनक सारांश आहे.

# मुस्लिम बांधवाने केले हिंदु बांधवाचे अंतिम संस्कार ; ऐक्याचे अनोखे प्रतिक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एक मुस्लीम बांधव हिंदू बांधवाच्या मदतीला धावून जात अंतिम संस्कार हिंदू पद्धतीने करून एक अनोखे ऐक्याचे प्रतिक पनवेलकरांसाठी त्याने दाखवून दिले आहे.



पनवेल येथे राहणारे व खारघर येथे व्यवसाय करणारे सैय्यद खान लकी तवा हॉटेल हिरानंदानी खारघर यांना व खारघर पोलीस ठाण्याचे वपोनि शत्रुघ्न माळी यांना माहिती मिळाली की, त्यांचे एक मित्र व त्याचे मेव्हुणे हे कोरोनाग्रस्त असुन ते हॉस्पीटलमध्ये आहेत व त्यांचे सासरे हे कोरोनामुळे मृत्यू पावले आहेत. अशावेळी अंत्यसंस्कार करणार कोण? हा प्रश्न निर्माण झाला असता सय्यद खान यांनी पुढे येवून अंत्यविधी मी करतो असे सांगून पुढील व्यवस्था त्यांनी त्यांचे मित्र वपोनि शत्रुघ्न माळी, विजय पानवाला, सुफी भाई आदींच्या साथीने करून अंत्यविधी पार पाडला. कोरोनाच्या काळामध्ये वेगवेगळे वाईट अनुभव येत असताना एक वेगळे उदाहरण किंवा ऐक्याचे एक अनोखे प्रतिक म्हणून खान भाईकडे पाहिले जाणार आहे.

# महागांव उप प्राथमिक आरोग्य केंद्रात लसीकरण सुरू

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील नव्याने सुरु करण्यात आलेल्या महागांव उप प्राथमिक आरोग्य केंद्रात पालकमंत्री रायगड जिल्हा तथा राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य ना.कु. आदितीताई तटकरे यांच्या प्रयत्नाने महीला बालकल्याण सभापती जि.प यांच्या उपस्थितीत तळा तालुक्यातील महागाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे ५४ वर्षे वरील नागरिकांना कोरोनावर मात करण्यासाठी लस उपलब्ध करून लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे.



महागाव प्राथमिक आरोग्य केंद्रात पहिली लस साळशेत गावचे नागरिक कृष्णा लोंढे यांना देण्यात आली. तालुका ठिकाणा पासून अंदाजे १५ कि.मी अंतरावर महागांव असल्याने औषधोपचारासाठी तळा येथे यावे लागत होते. हे लक्षात घेऊन उप आरोग्य केंद्राची मंजुरी देण्यात आली होती. सदर आरोग्य केंद्राचे बांधकाम पुर्ण होऊन सुरू करण्यात आले नव्हते. तळा पत्रकार संघटनेने सातत्याने पाठपुरावा करून वर्षभरापूर्वी कार्यान्वित करण्यात आले. त्यामुळे आज कोरोना महामारी रोगावर मात करण्यासाठी लसीकरण सुरू करण्यात आले. त्यामुळे या पंचक्रोशीतील जनतेची उत्तमसोय झाली असून वेळ व पैसा वाचला असल्याने समाधान व्यक्त करीत आहेत.

यावेळी तळा पंचायत समिती सभापती अक्षरा सचिन कदम, रायगड जिल्हा परिषद महिला व बालकल्याण सभापती गीता उत्तम जाधव, सरपंच, सुषमा कसबले, उपसरपंच, सचिन जाधव, अँड उत्तम जाधव, सचिन कदम, कीशोर शिंदे, अनंत खराडे, नितीन कदम, कमलाकर मांगले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद गोरेगावकर, डॉअमोल बिरवटकर, डॉ.पाटील मॅडम, मोहीत (बाबू) मोरे, आशा प्रवर्तक नूतन ठिगळे, तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते व प्राथमिक आरोग्य केंद्र महागावचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# शाळांकडून पूर्ण शुल्क वसुली तरीही शिक्षकांच्या वेतनात कपात ; काही शैक्षणिक संस्थांकडून पगार सुद्धा गोठवले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल हे शैक्षणिक हब झालेले आहे. कोरोना वैश्विक संकटामुळे गेल्या वर्षभरापासून ऑनलाईन शिक्षण सुरू आहे. शिक्षकांना तीच कसरत करावी लागत आहे अन्यथा त्याहून अधिक परिश्रम घ्यावे लागत आहे. शाळा पालकांकडून पूर्ण फी वसूल करीत आहे. मात्र शिक्षकांना ५० ते ४० टक्के इतकेच वेतन दिले जात आहे. काही शैक्षणिक संस्थांनी सर्व शिक्षकांचे पगार सुद्धा गोठवली आहेत. त्यामुळे ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांवर अतिशय वाईट वेळ आली आहे. शाळांवर कोणाचेच नियंत्रण नसल्याने पालकांबरोबर आता शिक्षकांचेही आर्थिक शोषण होऊ लागले आहेत.

पनवेल परिसरात अनेक शैक्षणिक संस्थांनी आपले बस्तान बसवले आहे. सिडकोकडून कमी दरामध्ये भूखंड घेऊन या संस्थांनी इमले बांधले आहेत. येथे इंग्लिश आणि सेमी इंग्लिश शाळा सुरू केल्या आहेत. स्टेटस सिम्बॉल म्हणून आपल्या पाल्यांना या शाळांमध्ये प्रवेश देण्यासाठी पालकांची अक्षरशा चढाओढ दरवर्षी लागते. त्यासाठी लाखो रुपयांचे डोनेशन दिले जाते. महिन्याला हजारो रुपयांची फी अदा केली जाते. येथे एक प्रकारे शिक्षणाचे व्यापारीकरण करण्यात आले आहे. गेल्या वर्षभरापासून कोरोना वैश्विक संकटामुळे शाळा बंद आहेत. त्यामुळे ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. असे असले तरी सगळ्या शाळांकडून गेल्या शैक्षणिक वर्षात सगळी फी वसूल करण्यात आलेली आहे. त्यामध्ये कोणतीही सवलत पालकांना देण्यात आले नाही. टाळे बंदीच्या काळातही पालकांना फी साठी वेठीस धरण्यात आले. शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यांना ऑनलाईन क्लासेस मध्ये प्रवेश दिला जात नाही. कोरोना संकटामध्ये जवळपास सर्वच पालकांनी आपल्या पाल्यांचे शुल्क शाळांकडे आदा केले. वास्तविक पाहता ट्यूशन फी वगळता बाकी इतर शुल्क शाळेने घेण्याची मागणी ठिक ठिकाणी करण्यात आली होती. मात्र या शैक्षणिक संस्थांनी एक रुपयाही शुल्क कमी केले नाही. असे असताना शिक्षकांना पूर्ण पगार का देण्यात आला नाही असा सवाल उपस्थित होत आहे. बहुतांशी शाळांकडून आपल्या शिक्षकांना ५० ते ४० टक्के इतकेच वेतन दिले जात आहे. ऑनलाइन शिक्षणामध्ये उलट शिक्षकांना अधिक मेहनत करावी लागते. असे असताना संबंधितांच्या पगारामध्ये कपात करण्यात आली आहे. काही शाळांनी तर वेतनच दिले नसल्याच्या तक्रारी येत आहेत. शिक्षण विभागाचे संबंधितांवर नियंत्रण नसल्याने ही स्थिती निर्माण झाली असल्याचे शिक्षण तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षक पूर्णवेळ शिकवत असुन सुद्धा त्यांचे आर्थिक शोषण केले जात आहेत. कोरोनाच्या नावावर त्यांच्या वेतना मध्ये कपात केली जात आहे. अगोदरच समान काम समान वेतन मिळत नाही. त्यात हे संकट आल्याने त्यामधील अर्धा पगार कापला जात आहे. याबाबत आवाज उठवल्यास आपल्या नोकरीवर गदा येईल. जे मिळत आहे ते सुद्धा मिळणार नाही अशा प्रकारच्या भीतीमुळे शिक्षकांनी हाताची घडी आणि तोंडावर बोट ठेवणे या काळामध्ये पसंत केले आहे.

खाजगी शिक्षण संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षिकांच्या पगारावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. त्यांनी त्यावर नवीन घरसुद्धा घेतलेले आहे. याशिवाय इतर वस्तू खरेदी केल्या आहेत. गेल्या वर्षभरापासून पूर्ण पगार हातात येत नसल्याने उदरनिर्वाह करायचा कसा त्याचबरोबर घराचे व इतर वस्तूंचे हप्ते फेडायचे कसे असा यक्षप्रश्न शिक्षकांसमोर उभा राहिलेला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सिडकोच्या सहकार्याने करण्यात येणार पाम बीच मार्गाचे विस्तारीकरण

मुंबई महानगर प्रदेशाच्या अद्ययावत व्यापक परिवहन अभ्यासानुसार सदर संधानता हा ठाणे ते सानपाडा या किनारी मार्गाचा भाग आहे. पाम बीच मार्गाच्या विस्तारीकरणाच्या खर्चाचा काही भार सिडकोने उचलावा, अशी विनंती नवी मुंबई महानगरपालिकेकडून सिडकोला करण्यात आली होती. त्यानुसार, सिडकोने ५०:५० या प्रमाणात खर्च उचलण्याची तयारी दर्शविली आहे. सदर विस्तारीकरणाला रु. २५० कोटी इतका खर्च अंदाजित असून सिडको आणि नवी मुंबई महानगरपालिका प्रत्येकी रु. १२५ कोटी खर्चाचा भार उचलणार आहेत. रस्ते आणि पूल उभारून पाम बीच मार्गाचा १.९४ कि.मी. चा हा विस्तारीत टप्पा पूर्ण करण्यात येणार आहे. पाम बीच मार्गाच्या विस्तारीकरणामुळे ऐरोली आणि घणसोली दरम्यान अधिक सुलभ संधातना लाभणार आहे. या प्रकल्पामध्ये सिडको कमाल रु. १२५ कोटींची गुंतवणूक करणार असून प्रकल्पाची किंमत वाढत गेली तरी सिडकोकडून या व्यतिरिक्त कोणताही अतिरिक्त खर्चाचा भार उचलण्यात येणार नाही. सदर विस्तारीकरण प्रकल्पाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेणे, आवश्यक त्या परवानग्या मिळवणे ही जबाबदारी नवी मुंबई महानगरपालिकेची असणार आहे. विस्तारीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर सिडकोकडून नवी मुंबई महानगरपालिकेस प्रकल्प खर्चाचा निधी हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

## चिरनेर हायस्कूल जवळील पुल धोकादायक अवस्थेत

या पुलाच्या समोरच मोठे वळण असल्यामुळे एखाद्या वाहनावरील नियंत्रण सुटल्यास हे वाहन थेट नाल्यात पडण्याचा धोका आहे. नुकतेच या मार्गाच्या नुतनीकरणासाठी ११७ कोटी रूपये खर्च करण्यात आले. मात्र हा धोकादायक पुल गेल्या कित्येक वर्षापासून तसाच आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने गव्हाण फाटा ते चिरनेर आणि चिरनेर ते आवरे,खोपटा या परिसरातील पुलाची पाहणी करावी अशी मागणी चिरनेर गावातील युवा नेते राजेंद्र भगत व प्रवाशी नागरीकांकडून करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता सी.बी. बांगर याना विचारणा केली असता पुलाची लगेच तपासणी केली जाईल आणि त्या बाबतचा अहवाल वरिष्ठांना पाठविण्यात येईल असे सुचित केले आहे.

## रोह्यात मृत्यूदर वाढला ; दुसऱ्या लाटेने घेतले ७० हुन अधिक जणांचे बळी

नागरिक सभागृहात स्थलांतरित केल्यावर लोकांची होणारी गैरसोय दूर होईल असे वाटले होते. मात्र लसींचा वारंवार होणारा तुटवडा आणि पुढाऱ्यांच्या वाशिले बाजीने लसीकरणासाठी पहाटे ५ वाजल्यापासून रांगा लावणारे सामान्य लोक खूप त्रस्त झाले आहेत. सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे स्वयंसेवक लसीकरणकेंद्रावर सेवा देत असे पर्यंत तेथे वशिलेबाजी होत नव्हती. अबाल वृद्ध नागरिकांनाही त्यांची चांगली मदत होत होती. अतिशय शिस्तबद्धपणे हे तरुण तेथें सेवा देत होते, मात्र पुढाऱ्यांना वशिलेबाजी करता येत नसल्याने या स्वयंसेवकांना हेतुपूर्वक तेथे काम करू नये असे सांगण्यात आले. लसीकरणात गलिच्छ राजकारण होत असल्याचा जाहीर आरोप सेवाभावी तरुण रोशन चाफेकर याने केले आहे. रोहा किल्ला येथिल कोविड केयर सेंटरमध्ये ठिक ठिकाणी अस्वच्छता दिसून येत असून कोविड रुग्णांनाच तेथे साफसफाई करावी लागत आहे. याबाबत कोविड रुग्णांनि काही व्हिडीओ क्लिप्स ही वायरल केल्या मात्र तेथील परिस्थितीत सुधारणा नसल्याचे रुग्णांचे नातेवाईक सांगत आहेत. ग्रामीण भागात एखादा कोव्हीड संशयित रुग्ण आढळल्यास सदर रुग्णाला रुग्णालयात हलविण्यासाठी १०८ क्रमांकावर फोन साधावा असे सांगण्यात येते. परंतु १०८ रुग्णवाहिका सध्या अति गंभीर आजारी रुग्णांना ने आण करण्यात व्यस्त असल्याने अनेकदा येऊ शकत नाहीत असे चित्र आहे. खाजगी गाड्यांमधून पॉझिटिव्ह रुग्णाची ने आण करताना सदर वाहतूक करणारे देखील पॉझिटिव्ह होत आहेत. यामुळे प्रशासनाने संशयित कोव्हीड रुग्ण तसेच उपचारानंतर घरी पाठवताना देखील रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पण आरोग्य विभाग आणि प्रशासनाचा ढिसाळ कारभार यामुळे रुग्णांना रुग्णवाहिका उपलब्ध होत नाहीत.


## खुली ई–निविदा सूचना
## ग्रामपंचायत विचुंबे
## ता.पनवेल, जि.रायगड
## सूचना क्रमांक : ०१ सन : २०२०–२०२१

ग्रामपंचायत विचुंबे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांचेकडील ग्रामपंचायत सन २०२०–२०२१ ग्रामनिधी अंतर्गत खालील कामाची योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून Percentage Rate Tender Online निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन Online पद्धतीने संगणक प्रणालीवर प्रसिद्ध होईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा फॉर्मची निविदा फी (ना परतावा) | १% इसारा/ बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | Construction of Pipe Gutter Work Namdev Mhatre To Sagar Mhatre In Vichumbe. | 726602.00 | 726602.00 | 726602.00 |
| २ | Construction of Concrete Gutter From Krushna Vandana Society To Omkar Krushna Row House At | 690726.00 | 690726.00 | 690726.00 |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :–

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई–निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सद निविदा, नोटीस, सूचना, शुद्धीपत्रक इत्यादी माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

२) वरील कामाची निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | १२/०५/२०२१ | सकाळी ११.०० पासून | १८/०५/२०२१ | सकाळी १०.०० पर्यंत |
| निविदा फॉर्म व परिशिष्ट मिळविण्याचा कालावधी (डाऊनलोड) | १२/०५/२०२१ | सकाळी ११.०० पासून | १८/०५/२०२१ | सकाळी १०.०० पर्यंत |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी (अपलोड) | १२/०५/२०२१ | सकाळी ११.०० पासून | १८/०५/२०२१ | सकाळी १०.०० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दिनांक : १९/०५/२०२१ सकाळी ११.०० वाजता | | | |

३) सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वीकारली जाणार नाहीत. ती स्कॅन करून ऑनलाईन सादर करावी.

४) निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविंपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

५) सदरील कोरी निविदा फी (Tender Fee) व इसारा अनामत रक्कम (EMD) NEFT द्वारे ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.

६) लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रे ई–निविदा मध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच सादर केलेल्या सर्व कागदपत्रांवर ठेकेदारांनी स्वतःच्या स्वाक्षरीने साक्षांकित करूनच अपलोड करावी. अन्यथा सदरची निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

७) सदर निविदा दर सन २०२०–२१ करिता मंजूर राहील.

८) निविदा दर हे Percentage Rate ने भरावयाचे आहे.

९) सदर निविदेसाठी नोंदणी प्रमाणपत्र (Registration Copy) प्रत Online सादर करावी.

११) GST प्रत Online सादर करावी.

१२) Pancard कॉपी ऑनलाईन सादर करावी.

१३) Adhar Card कॉपी ऑनलाईन सादर करावी.

१४) प्रतिज्ञापत्रक (DECLARATION) Online सादर करावे.

१५) Income Tax/ Vat परतावा ऑनलाईन सादर करावी.

१६) BID CAPACITY Certified By C.A प्रत आवश्यक राहील.

१७) PT Certificate प्रत आवश्यक राहील.

१८) ग्रामपंचायत नावे DD जोडला असल्यास तो निविदा उघडण्यापूर्वी ग्रामपंचायतीमध्ये सादर करावा न केल्यास कमी दराने भरलेली निविदा रद्द करण्यात येईल.

१९) मागील केलेल्या कामाचा कालावधी बाबत (WORK DONE CERTIFICATE) STATEMENT FORMET मध्ये ऑनलाईन सादर करावी.

२०) सदर निविदा प्रक्रियेसाठी किमान ३ निविदाधारक आवश्यक आहेत. कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या कंत्राटदारास काम देण्याचा विचार केला जाईल.

२१) कोणतेही कारण न दाखविता निविदा नाकारण्याचा व स्वीकारण्याचा अधिकार प्रसिद्धीधारकाने राखून ठेवला आहे.

२२) करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अशा अधिकाऱ्यासमोर करून द्यावा लागेल.

२३) रु.१००/– च्या स्वतंत्र स्टँम्प पेपरवर विहित नमुन्यात केलेले प्रतिज्ञापत्र स्कॅन करून त्याची प्रत अपलोड करावी.

२४) सु.बे.अ. व मजूर सहकारी संस्था यांनी विहित नमुन्यात हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा कोणतीही पुर्वसूचना न देता प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येतील.

२५) कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारे साहित्य पुरवठा होणार नाही.

२६) काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच संबंधित ठेकेदाराची नोंदणी ज्या विभागाची आहे त्या विभागास नोंदणी काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.

२७) निविदेबाबत काही वाद उद्भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत विचुंबे निर्णय घेईल तो निविदा धारकास बंधनकारक राहील.

२८) कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही.

२९) या कामासाठी आलेल्या निविदापैकी कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहे आणि निविदा पाठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला (निविदा) फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

३०) मागविलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहील.

३१) सदरील कामाच्या दर्जा संदर्भात महाराष्ट्र शासन नियमानुसार देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३२) ठेकेदाराचे नाव, कायमचा राहण्याचा पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक ई. तपशिलांची माहिती विभागास सत्वर सादर करण्यात यावी.

**सही/–**
**सरपंच**
**ग्रामपंचायत विचुंबे**

**सही/–**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत विचुंबे**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रोहा तालुक्यातील मौजे वरसे येथील नवीन आरोग्य उपकेंद्रासाठी जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रोहा तालुक्यातील मौजे वरसे येथील नवीन आरोग्य उपकेंद्र इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर मौजे वरसे ता.रोहा येथील गट. नं.४१/ब,क्षेत्र ०.७७.५० हे.आर.पैकी ०-०५-० हे.आर. इतके क्षेत्र, भौगोलिक मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जा हक्काने जमीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे नवीन आरोग्य उपकेंद्र भुवनेश्वरसाठी, ता.रोहा करिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत. रोहा तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे.

## जाळ्यात अडकलेल्या मगरीची सुटका

**दै.रायगड नगरी । महाड**

मासे मारण्याच्या जाळ्यात अडकलेल्या मगरीची शहरातील ग्रीन पार्क इमारती मधील तरुण आणि सिस्केपच्या सदस्यांनी सुखरूप सुटका करून वनविभागाच्या मदतीने तिला सुरक्षित ठिकाणी सोडले.

ग्रीन पार्क इमारतीनजिक नदी पात्रात मासेमारी करणाऱ्या एका इसमाने मासे मारण्याच्या जाळ्यात एक मगर अडकून पडल्याची माहिती या सोसायटीमधील बाबू कदम, राजुदास पवार, सतिश पवार, विजय पवार, बजरंग दाभेकर आणि रोशन माने यांना दिली. या सर्वांनी नदी पात्राजवळ जात या मगरीला बाहेर काढले. आणि सिस्केप संस्थेला याची माहिती दिली.

त्यानंतर सिस्केप चा सदस्य ओंकार माने याने वनविभागाला कळविले. वन विभागाचे अधिकारी प्रशांत शिंदे, वनपान विजयकांत पवार, वनरक्षक पी .डी. जाधव, प्रकाश पवार यांच्यासह संस्थेचे सदस्य ओमकार माने, अक्षय भवरे,परेश खाडे,श्रद्धा जोशी,चिंतन वैष्णव,मित डाखवे,प्रणव कुलकर्णी,योगेश गुरव यांनी जाळ्यातून सुखरूप बाहेर काढून सदर मगरीची पाहणी केली गेली. पाहणी अंती असे लक्षात आले की सदर मगर एप्रिल महिन्यामध्ये वडवली गावात पकडली होती.

वनविभाग, महाड व सिस्केप संस्थेच्या मदतीने मगरीला जाळ्यातून सोडवून पुन्हा तिच्या मूळ अधिवासात सोडण्यात आले.

## माणगांव पोलीस निरिक्षकपदी कर्तव्यदक्ष अश्वनाथ खेडकर यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव पोलीस स्टेशनच्या पोलीस निरिक्षक पदी अश्वनाथ बप्पाजी खेडकर यांची नेमणुक झाल्याने दिनांक ११ मे २०२१ रोजी रात्री त्यांनी माणगांव पोलीस स्टेशनला हजर होताच पदभार स्विकारला आहे. माणगांव पोलीस स्टेशनला येण्याआधी सेकंड इनचार्ज ट्रॅफीक कडे त्यांनी कार्यभार सांभाळला तत्पूर्वी म्हसळा पोलीस स्टेशनला ते कार्यरत होते. अतिशय तडफदार कर्तव्यदक्ष अधिकारी अशी ओळख असलेले पोलीस निरिक्षक खेडकर यांची सन १९९७ ते २००१ मध्ये मुंबई येथेही सेवा झाली आहे. माणगांव पोलीस ठाण्याचे याआधीचे पोलीस निरिक्षक प्रदिप देशमुख यांची बदली झाली आहे.



माणगांव तालुक्यात कायदा सुव्यवस्था आणि शांतता राखण्यासाठी आपली प्राथमिकता असेल तसेच माणगांवकरांकडुन संपुर्ण सहकार्याची मला अपेक्षा आहे. अशी पहिली प्रतिक्रिया पोलीस निरिक्षक खेडकर यांनी प्रस्तुत पत्रकार यांचेशी बोलताना दिली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलांने कायम खरेदीखत / करारनामा करून प्रस्ताविक जमीन मालक १) श्री.विश्वास विष्णू पाटणकर, २) श्री.जयंत विष्णू पाटणकर या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पोयंजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| पोयंजे | ५२/२ | ०-०९-१० | ०.२२ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तींचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१२/०५/२०२१

**सही/-**
**ॲड.श्री.महेंद्र अनंता पाटील**
**शॉप नं.१०९, पनवेल महानगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.८८९८०४४६७८**

# म्हसळा भाजी आणि मच्छी मार्केटचे नगरपंचायत करणार स्थलांतर

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा नगर पंचायतीने कोरोनाच्या पहिल्या लाटेत ज्या पद्धतीने कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करून परिस्थिती नियंत्रणात आणली होती त्याच पद्धतीने नियंत्रण ठेवण्यासाठी दुसऱ्या लाटेत काही अनर्थ घडु नये यासाठी अधिक उपाययोजना म्हणुन म्ह-सळा शहरातील तालुक्याची मुख्य बाजारपेठत ग्राहकांची होणारी गर्दी टाळण्यासाठी आणि कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी आता म्हसळा नगर पंचायत निमुळत्या जागेत दाटीवाटीने दुकानांची रचना असणारी भाजीपाला आणि मच्छीविक्री मार्केट अन्य ठिकाणी स्थलांतरित करणार असल्याचे तसेच म्हसळा ग्रामीण रुग्णालयात कार्यान्वित असलेले कोरोना प्रतिबंधक लसीकरण केंद्र (vaccinet ward) रायगड जिल्हा परिषदेच्या मराठी कन्या शाळेत कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती म्हसळा नगर पंचायतीचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी माहिती देताना सांगितले.



त्यांनी अधिक माहिती सांगताना म्हसळा नगर पंचायतीचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी अमित शेटगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत म्हसळा तालुक्यात नियंत्रणात असणारा कोरोना प्रादुर्भाव अधिक प्रमाणात वाढु नये त्या बाबतीत काही उपाययोजना म्हणून बाजारपेठेत होणारी गर्दी नियंत्रणात आणने गरजेचे आहे यासाठी भाजी मार्केटिंग अंजुमन हायस्कूलच्या प्रांगणात तर मच्छी मार्केट दिघीरोड आणि पाभरे फाटा येथे हलविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. भाजीपाला विक्री करिता जागा उपलब्ध होण्यासाठी अंजुमन शाळा संस्थेच्या संचालक मंडळाकडे बोलणी सुरू असल्याचे त्यांनी सांगताना मिरची गल्लीतील किराणा दुकानदारांनी दुकाना समोर मिरची पोते न ठेवता दुकानात मिरची विक्री करू नये असे निर्बंध घालण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी माहिती देताना सांगितले.

म्हसळा ग्रामीण रुग्णालयात कोरोना बाधीत रुग्णावर उपचारासाठी डेडिकेटेड केअर सेंटर कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री आदिती तटकरे यांनी रुग्णालयाला भेट दिली असता जाहीर केले आहे आहे त्या मुळे येथील लसीकरण केंद्र कन्या शाळेत सुरक्षित स्थळी कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले आहे.

म्हसळा शहरातील तालुका बाजारपेठेत ही तालुक्यातील ८१ गाववाडी वस्तीतील ग्राहकांसाठी मुख्य बाजारपेठ आसुन लॉकडाऊन कार्यकाळात शासन निर्बंधा नुसार केवळ अत्यावश्यक सेवेसाठी सकाळी ७ ते ११ पर्यंत बाजरपेठे सुरू असते त्यामुळे म्हसळा बाजरपेठेत रोज खरेदीसाठी याहू गर्दी असते त्यातच म्हसळा बाजारपेठ निमुळत्या जागेत दाटीवाटीने वसलेली असल्याने कोरोना प्रादुर्भाव नियम पाळण्याचा दुकानदार किंवा ग्राहक यांनी कितीही प्रयत्न केला तरी तो शक्य होणार नाही असे चित्र असल्याने म्हसळा नगर पंचायतीने राज्यात लॉकडाऊन असे पर्यंत सुकी मिरची विक्री, भाजीपाला, मच्छी मार्केट मध्ये ग्राहकांची गर्दी होणार नाही अशा अन्य प्रशस्त जागेत स्थलांतरीत करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी जाहीरपणे कळविले आहे. कोरोनाचे नियम पाळुन म्हसळा तालुक्यात प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांनी शासनाला सहकार्य करण्याची विनंती केली आहे.

# सुर्योदय फाऊंडेशन आणि समाजसेवक कृष्णा महाडिक यांचे मनापासून आभार



**दै.रायगड नगरी । तळा**

'आभारी आहे', 'थँक यु' हे आपल्या जीवनात नेहमी वापरले जाणारे शब्द अगदी घरातुन बाहेर जाताना रिक्षावाल्याने शंभर रुपये सुट्टे दिले तरी आपण त्याचे आभार मानतो, ट्रेनमधील मित्र, ऑफीसमधील मित्र रस्त्यावर जाता येता आपल्याला मदत करणारी व्यक्ती अशा सर्वांचे आपण आभार मानतो पण कोणीतरी आपल्या मार्गावर सतत सावली बनून आपल्याला हात देत जगण्याचा मार्ग सुकर आणि आनंददायी करत असते. अशा व्यक्तीचे आभार कीती जरी मानले तर ते कमीच पडतील. अशाच व्यक्तीचे रायगड जिल्हा विशेष करुन तळा तालुका आभार मानत आहे आणि ती व्यक्ती म्हणजे रायगड भुषण समाजसेवक कृष्णा महाडिक. कोरोना काळात रक्ताचा तुटवडा कमी पडु नये म्हणुन रक्त दात्यांना रक्तदान करण्यासाठी प्रवृत्त करण्यापासून रक्तदान शिबीर आयोजित करणे, गरजवंतांना जीवनावश्यक वस्तु मिळवुन देण्यापासुन ते चक्रीवादळात अनेक कॉलेज शाळांची पडझड झाली कॉलेज शाळांची छप्पर उडाली असताना सामाजिक संस्थांकडून मदतीचा हात समाजसेवक कृष्णा महाडिक यांनी दिला आहे आज पुन्हा ते रायगड वासियांसाठी धावुन आले आहेत.

ग्रामीण भागात कोरोना रुग्णांचे प्रमाण कमी प्रमाणात असले तरी सुरक्षितता म्हणुन प्राणवायूचा कमतरता होऊ नये यासाठी सुर्योदय फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा पद्मश्री डॉ.अनुराधा पौडवाल यांच्या संस्थेमार्फत आणि समाजसेवक कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नातून माणगांव शासकीय रुग्णालय कोविड सेंटर- २ ऑक्सिजन मशीन, श्रीवर्धन शासकीय रूग्णालय कोविड-२ ऑक्सिजन मशीन, लोणेरे शासकीय कोविड सेंन्टर - २ ऑक्सिजन मशीन म, तळा प्राथमिक आरोग्य केंद्र-१ ऑक्सिजन मशीन म्हसळा शासकीय ग्रामीण रुग्णालय -१ ऑक्सिजन मशीन यांना वाटप करण्याचे जाहीर करण्यात आले.

त्या अनुषंगाने तळा येथील नगरसवक चंद्रकांत रोडे, समाजसेवक महेंद्र कजबजे यांनी मुंबई घाटकोपर येथील सुर्योदय फाऊंडेशन कार्यालयास भेट देऊन तळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे ऑक्सिजन मशीन ताब्यात घेऊन आज दि.१२.५.२१ रोजी तळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल बिरवडकर यांना सुपर्द केले यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्राची घोसाळकर, नगरसेवक चंद्रकांत रोडे, महेंद्र कजबजे, श्रीराम काजबजे, मितेश मुळे, राकेश नांदगावकर, सौ.मुळे आदि मान्यवर उपस्थित होते.

### ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

**जाहीर निविदा**

दि.१२/०५/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील ग्रामनिधी योजनेंतर्गत खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. १३/०५/२०२१ ते २०/०५/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.२१/०५/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कोळखे गावातील सांडपाणी निचरा होण्याकरिता नवीन गटार खोदणेबाबत. | ५०४५०/- | ५०४/- | १ महिना |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**

# तळोजामध्ये ट्रेलरमधील बॅटऱ्याची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा एमआयडीसीमध्ये उभ्या करून ठेवलेल्या तीन ट्रेलरमधून बॅटऱ्यांची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडल्याने परिसरातील वाहन चालकांमध्ये भितीयुक्त वातावरण आहे. मनिष रमेश तिवारी यांच्या रेश्मा ट्रान्सपोर्ट कंपनीच्या मालकीचे एकूण तीन ट्रेलर हे सिल्व्हर स्प्रिंग कॉम्प्लेक्स तळोजा औद्योगिक वसाहत या ठिकाणी उभे असतात. त्यातील प्रत्येक ट्रेलरमधील दोन बॅटऱ्या अशा एकूण ६ बॅटर्यांची ज्याची किंमत जवळपास १२ हजार रुपये इतकी आहे चोरुन अज्ञात चोरटे पसार झाले आहेत.

### उपविभागीय अधिकारी, माणगांव विभाग माणगांव यांजकडून

## शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूस/कात-२/एसआर-६०/२०११ दुरुस्ती, उप विभागीय अधिकारी माणगांव, विभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/ उविअमा/भूस/कात-२/जावटे/६०, अन्वये मौजे : जावटे, ता.माणगांव, जिल्हा : रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम ३२ (१) ची अधिसूचना स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१५ व २०१६ रोजी प्रसिद्ध झालेल्या आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण ६, दिनांक १९ फेब्रुवारी २०१९ च्या अधिसुचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०१८/ (३६९)/उद्य-ोग-१४ दिनांक ६ एप्रिल, २०२१ अन्वये मौजे : जावटे, ता.माणगांव, जि.रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसुचनेतील काही सर्व्हे नंबर मधील क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार ब पृष्ठ क्रमांक ०५-०७ मध्ये दिनांक ६ एप्रिल २०२१ रोजी जाहीर केले आहे.

त्याअर्थी, स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१५ व २०१६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या कलम ३२ (१) ची अधिसुचनेत खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**

**जिल्हा : रायगड, ता.माणगांव, गांव : जावटे**

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| स.नं./ गट नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | स.नं./ गट नं. | स.नं./ गट नं. | स.नं./ गट नं. |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| ९ | २ अ | १.००७ | ९ | २ अ | १.००८ |
| १३ | ५/९/८ ड | ०.१२० | १३ | ५/९/८ ड | ०.१२९ |
| १७ | १/६ | ०.०३३ | १७ | १/६ | ०.०२३ |
| २० | १ | १.६५८ | २० | १ | ०.०४५ |
| २३ | १ क | ०.०१० | २३ | १ क | ०.४८३ |
| २३ | १ ड | ०.४८३ | २३ | १ ड | ०.०१० |
| ३० | १ अ | ०.१६० | ३० | १ अ पै | ०.१३० |
| ३० | ३ अ | ०.०३० | ३० | ३ अ पै | ०.०२८ |
| ३० | ३ ब | ०.१६३ | ३० | ३ ब पै | ०.१०१ |
| ३१ | २ | ०.०५३ | ३१ | २ पै | ०.०२३ |
| ३१ | ३ | ०.०१३ | ३१ | ३ पै | ०.००३ |
| ३२ | १ अ+३ | ०.६९४ | ३२ | १ अ+३ पै | ०.६४९ |
| ३२ | १ ब+८ | ०.६९७ | ३२ | १ ब+८ पै | ०.६०० |
| ३२ | ४ | ०.०७० | ३२ | ४ पै | ०.०३४ |
| ४० | ९ | ०.०४० | ४० | ९ | ०.०१० |
| ४० | १६ अ पै | ०.७८० | ४० | १६ अ | ०.८८० |
| ४० | १६ इ | ०.००५ | ४० | १६ इ | ०.०१० |
| ४३ | २ अ | २.१४२ | ४३ | २ अ | १.८९० |
| ४४ | २ | ३.९०१ | ४४ | २ | २.८०० |
| ४६ | १० ग | ०.१६० | ४६ | १० ग | ०.१२० |
| ४६ | १० ज | ०.१२० | ४६ | १० ज | ०.१६० |
| | | **१२.३३९** | | | **९.१३६** |

**ठिकाण : माणगांव**
**दिनांक : /०४/२०२१**

**सही/-**
**(प्रशाली जाधव-दिघावकर)**
**उपविभागीय अधिकारी**
**माणगांव विभाग माणगांव**

**क्र.जिमाका/राअ/जाहि/२२/२०२१-२२**

# संक्षिप्त...

## म्हसळा तालुक्यातील मौजे संदेरी येथील नवीन आरोग्य उपकेंद्रासाठी जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

म्हसळा तालुक्यातील मौजे संदेरी येथील नवीन आरोग्य उपकेंद्र इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे संदेरी ता.म्हसळा येथील स.नं./हि.नं.१४२, क्षेत्र ०.४९.० हे.आर.पैकी ०-०५-० हे.आर. इतके क्षेत्र, ग्रुप ग्रामपंचायत संदेरी यांच्याकडे निहीत असलेल्या शासकीय मिळकत ग्रुप ग्रामपंचायत संदेरी ता.म्हसळा यांच्याकडून शासनाकडे पुर्नग्रहण करण्यात आली असून ही जमीन भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जा हक्काने जमीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे नवीन आरोग्य उपकेंद्र संदेरीसाठी, ता.म्हसळाकरिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत. म्हसळा तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे.

## रानबाजिरे आदिवासीवाडीतील महिलांसाठी सॅनिटरीपॅड वाटप



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

सदगुरू सेवा प्रतिष्ठान, पुणे आणि धैर्य सामाजिक संस्था, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे आदिवासीवाडी येथील सर्व आदिवासी महिलांसाठी मोफत सॅनिटरी पॅड वाटप उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी स्वदेस फाउंडेशन च्या आरोग्य विभाग कर्मचारी जुलेखा शेख, स्वदेस मित्र विमल सावंत, धैर्य सामाजिक संस्था अध्यक्ष ओंकार उतेकर उपस्थित होते. महिलावर्गासाठी मासिक पाळीच्या दिवसांत स्वच्छता तसेच सॅनिटरी पॅडचा वापर आणि योग्य विल्हेवाट याबाबत जुलेखा शेख यांनी महिलांचे मार्गदर्शन केले. विमल सावंत यांनी सर्व महिलांना एका ठिकाणी जमवून सामाजिक अंतराचे पालन करण्यास आणि सॅनिटरी पॅड वाटप करण्यास मदत केली. या उपक्रमाचा एकूण ४५ आदिवासी कुमारीका आणि महिलांना लाभ मिळाला.

या उपक्रमासाठी सदगुरू सेवा प्रतिष्ठान, पुणेचे अध्यक्ष सचिन म्हसे यांनी पुढाकार घेऊन रानबाजिरे गावातील आदिवासी महिलांसाठी देणगी स्वरूपात मदत केली.

# पनवेल महापालिकेने १ लाख कोव्हिड लसीकरणाचा टप्पा ओलांडला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेने एक लाख कोव्हिड लसीकरणाचा टप्पा ओलांडला असून आत्तापर्यंत १ लाख १ हजार ७५ लसींचे डोस नागरिकांना देण्यात आले आहे. आजपर्यंत ७६ हजार ७५५ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे. यामध्ये आरोग्य कर्मचारी १० हजार ८७७, पहिल्या फळीतील कर्मचारी ७ हजार ६६, जेष्ठ नागरिक ३४,३२७, कोमॉर्बिड १९ हजार ७२१ आणि १८ ते ४४ वयोगटातील ४ हजार ७६४ यांचा समावेश आहे.

शासनाच्या निर्देशानुसार पहिल्या टप्प्यामध्ये आरोग्य कर्मचारी, दुसऱ्या टप्प्यांमध्ये पहिल्या फळीवर काम करणारे कर्मचारी, तिसऱ्या टप्प्यांमध्ये ६० वर्षावरील तसेच ४५ वर्षावरील नागरिकांचे लसीकरण केले जात आहे. दिनांक १ मे पासून १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांसाठी मर्यादित स्वरूपात लसीकरणास सुरूवात करण्यात आले होते व यामध्ये सहा हजार डोस देण्यात आले आहे. आज अखेर पनवेल महापालिका क्षेत्रात एकूण एक लाख लसीकरण पूर्ण झाले आहे.

सध्या पालिका क्षेत्रात एकुण ११ शासकीय आणि १४ खाजगी लसीकरण केंद्र कार्यरत आहेत. प्रत्येक केंद्रावर रोज २०० कुपन्सचे वाटप केले जात आहे. रोज सरासरी ३५०० लसीकरण होत असून आजवर लसीकरणाची ९३१ सत्रे घेण्यात आली आहेत.



पनवेल महानगरपालिकेला शासनाकडून जसे जसे लसींचा साठा महापालिकेला उपलब्ध होईल तसे तसे विविध केंद्रावर नागरिकांसाठी लस देण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे.

> ४५ वर्षाच्या वरील ज्या नागरिकांचा कोविशिल्डचा दुसरा डोस राहीला आहे त्या नागरिकांनी नजीकच्या लसीकरण केंद्रावर जाऊन डोस घ्यावा.
>
> **- सुधाकर देशमुख,**
> **आयुक्त पनवेल महापालिका**

# बारशिव-भोईघर रस्त्याची दुरवस्था ; पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम होणार काय?

### वाहन चालक व ग्रामस्थांचा सवाल

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

अलिबाग-मुरुड रस्त्यावर बारशिव-भोईघर रस्त्याचे दुरुस्ती व डांबरीकरण काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून होत असून हे काम पावसाळ्यापूर्वी होणार काय? असा सवाल वाहनचालक व ग्रामस्थांतून विचारला जात आहे.

दुर्गम ग्रामीण भागातील दुवा असलेल्या बारशिव-भोईघर, टेंभुर्डे, काजूवाडी रस्त्याची मागील वर्षी तीन जून रोजी झालेल्या चक्रिवादळामुळे तसेच पावसाळ्यात खाच खळगे व खड्ड्यांमुळे पार दुरावस्था झाली असून आजारी रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ व वाहनचालकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून बारशिव-भोईघर या चार कि.मी.रस्त्याचे काम कोट्यावधी रुपये खर्चून होत असून पावसाळा ऐन तोंडावर आलेला असता अर्धवट अवस्थेत आहे.या रस्त्यावर पसरुन ठेवलेली खडी वाहनांच्या ये-जा ने उखडून इस्तत: पसरली आहे. याचा देखील वाहनचालक व प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे.

आता पावसाळा ऐन तोंडावर आलेला असता बारशिव-भोईघर रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी होणार काय? असा सवाल वाहनचालक व ग्रामस्थांतून विचारला जात आहे.



# बनावट आरटीपीसीआर निगेटीव्ह रिपोर्ट देणाऱ्यास गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने केले जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कुठल्याही प्रकारचे स्वॅब न घेता दोन हजार रुपयांमध्ये 'कोव्हीड-१९' आरटीपीसीआर टेस्टचे निगेटीव्ह रिपोर्ट तयार करुन देणाऱ्या दुक्कली पैकी एकाला गुन्हे शाखा कक्ष- २ पनवेलच्या पथकाने कळंबोलीतून सापळा लाऊन अटक केली आहे.

गुन्हे शाखेने आता आरटीपीसीआरचे रिपोर्ट तयार करुन देणाऱ्या लॅब टॅक्नीशीयनचा शोध सुरु केला आहे. नोकरदार वर्गाला तसेच प्रवासासाठी आणि इन्शुरन्स क्लेमसाठी लागणारे 'कोव्हीड-१९'चे आरटीपीसीआर निगेटीव्ह रिपोर्ट स्वॅब न घेता, कळंबोलीत राहणारा संजय ईश्वर भंडारी (३५) दोन हजार रुपयांमध्ये तयार करुन ते व्हॉटस्ॲप द्वारे देत असल्याची माहिती उपनिरीक्षक वैभव रोंगे यांना मिळाली होती. त्यामुळे गुन्हे शाखेने दोन बोगस नावाने आधारकार्ड तयार करुन ते बोगस ग्राहकाच्या माध्यमातून संजय भंडारी याच्या मोबाईलवर पाठवून दिले. तसेच त्या नावाने आरटीपीसीआरचे निगेटीव्ह रिपोर्ट तयार करुन देण्यास सांगितले. यावेळी भंडारी याने दुसऱ्या दिवशी दुपारी दोन्ही व्यक्तींचे रिपोर्ट मिळतील, असे बोगस ग्राहकाला कळविले होते. त्यानुसार भंडारी याने दोन्ही व्यक्तींच्या नावाचे आरटीपीसीआर निगेटीव्ह रिपोर्ट बोगस ग्राहकाच्या मोबाईलवर व्हॉटस्ॲप द्वारे पाठवून दिले.

यानंतर सदर रिपोर्टचे ४ हजार रुपये घेण्यासाठी कळंबोलीतील केएलई कॉलेज जवळ आलेल्या भंडारी याला वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कराड, प्रविण फडतरे, पोलीस उपनिरीक्षक वैभव रोंगे आणि त्यांच्या पथकाने सापळा लावून पकडले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, सदरचे रिपोर्ट त्याला संकेत कोरडे या लॅब टेक्निशीयनने दिल्याचे सांगितले. त्यानुसार कळंबोली पोलिसांनी संजय भंडारी याच्यावर गुन्हा दाखल करुन लॅब टेक्निशीयन संकेत कोरडे याचा शोध सुरु केला आहे.

# इंटेरियरचे काम करण्याच्या बहाण्याने फसवणूक ; बंटी-बबलीचा खारघर पोलिसांकडून शोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इंटेरियर डिझायझरचे काम करण्याच्या बहाण्याने घर मालकांकडून लाखो रुपये उकळून त्यांचे काम पूर्ण न करता फसवणुक करणाऱ्या एका जोडप्याने खारघर मधील श्रीवास्तव दाम्पत्याची ४ लाख ५० हजाराची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. भानुप्रताप सिंग आणि अलका सुरी असे या जोडप्याचे नाव असून खारघर पोलिसांनी त्यांच्या विरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे. दरम्यान, सदर या जोडप्याने अशाच पध्दतीने सानपाडा येथे राहणाऱ्या एका विवाहितेला तसेच इंटेरियर डिझायनर व्यवसायाशी निगडीत असलेल्या दुकानदार, कारागीरांची देखील फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

खारघर, सेक्टर-२३ मध्ये राहणाऱ्या श्रीवास्तव दाम्पत्याने गत जुलै महिन्यामध्ये सेक्टर- २३ मधील फ्लॅट विकत घेतला होता. या घरात इंटेरियरचे काम करायचे असल्याने त्यांनी इंटेरियर डिझायनरचा शोध सुरु केला होता. यादरम्यान भानुप्रताप सिंग याने स्वत:हुन श्रीवास्तव यांना फोन करुन तो इंटेरियर डिझायनर असल्याचे सांगितले होते. त्यानंतर भानुप्रताप सिंग आणि त्याची साथीदार अलका सुरी या दोघांनी श्रीवास्तव यांच्या घरी जाऊन ७ लाख ४२ हजार रुपयांमध्ये त्यांच्या घराचे इंटेरीयर करुन देण्याचे निश्चित केले होते. त्यावेळी श्रीवास्तव यांनी ॲग्रीमेंट करण्याबाबत त्यांना सांगितले असता, भानुप्रताप आणि अलका या दोघांनी छोट्या कामाचे ॲग्रीमेंट करत नसल्याचे सांगून ॲग्रीमेंट करण्याचे टाळले. त्यानंतर त्यांनी वेगवेगळी कारणे सांगून श्रीवास्तव यांच्याकडून एकूण ४ लाख ५० हजार रुपये उकळले. या ठकसेनांनी श्रीवास्तव यांच्या घरी एका व्यक्तीला पाठवून घरातील टाईल्स आणि लाद्या काढून थातुरमातूर काम करण्याचा बहाणा केला. त्यानंतर त्यांनी श्रीवास्तव यांच्या घरातील काम करणे बंद केले. त्यामुळे श्रीवास्तव दाम्पत्याने भानुप्रताप आणि अलका या दोघांना अनेकवेळा संपर्क साधून त्यांच्या घराचे काम पूर्ण करण्यास सांगितले. मात्र, त्यांनी तुम्हाला काय करायचे ते करा असे बोलून टाळाटाळ केली. परिणामी, श्रीवास्तव यांनी त्यांच्याकडे आपले पैसे परत मागण्यास सुरुवात केल्यानंतर त्यांनी पैसे देण्यास देखील टाळाटाळ केली. त्यामुळे श्रीवास्तव यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज केल्यानंतर भानुप्रताप आणि अलका या दोघांनी श्रीवास्तव यांना अडीच लाख रुपये देण्याचे मान्य केले. मात्र, त्यांनी श्रीवास्तव यांना पैसे न देता त्यांची फसवणूक केली. त्यामुळे श्रीवास्तव यांनी भानुप्रताप सिंग आणि अलका सुरी या दोघांची माहिती काढली असता त्यांनी त्यांच्यासोबत कामाला असलेले मजूर, सुतारकाम करणारे, टाईल्स कारागीर, टाईल्स सप्लायर, प्लायवुड सप्लायर, इलेक्ट्रीशियन तसेच बांधकामाच्या व्यवसायाशी संबंधित दुकानदारांची लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी या दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार खारघर पोलिसांनी भानुप्रताप सिंग आणि अलका सुरी या दोघांविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, सदर जोडप्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात ५, सानपाडा आणि एनआरआय पोलीस ठाण्यात प्रत्येकी १ अशा सहा ते सात तक्रारी दाखल आहेत. अलका सुरी आणि भानुप्रताप या दोघांकडून फसवणूक झालेले अनेक मजूर आणि कारागीर त्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी पुढे येत आहेत. मात्र, सदर दोघांनी कोणत्याही प्रकारचे कागदोपत्री व्यवहार न केल्यामुळे त्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झालेले नाहीत.

या बंटी-बबलीने इंटेरियरचे काम करुन देण्याच्या बहाण्याने सानपाडा येथे राहणाऱ्या अंकिता शर्मा यांच्याकडून १४ लाख ५० हजार रुपये उकळून त्यांची देखील फसवणूक केली आहे. याबाबत अंकिता शर्मा यांनी सानपाडा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार देखील केली आहे. आरोपी भानुप्रताप सिंग याचा इंटेरियर डिझायनर व्यवसायाच्या आधी गरजू लोकांना कर्ज मिळवून देण्याचा, अपना लोन नावाचा व्यवसाय होता. या व्यवसायात देखील त्याने गरजू लोकांची लोन मंजूर करुन देण्याच्या बहाण्याने फसवणूक केली आहे.

# भारतीय मजदूर संघातर्फे जेएनपीटी हॉस्पिटलमध्ये जागतिक सिस्टर डे साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

१२ मार्च रोजी जागतिक सिस्टर दिनानिमित्त जेएनपीटी हॉस्पिटलमध्ये व कोविड सेंटरमध्ये काम करणाऱ्या सिस्टर यांचा भारतीय मजदूर संघातर्फे त्यांना प्रशस्तीपत्र, पेन व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला जेएनपीटीचे भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश पाटील, माजी विश्वस्त रविंद्र पाटील, जेएनपीटीचे वरीष्ठ चिकित्सक अधिकारी राज हिंगोराणी डॉ.केळकर, डॉ.राठोड,जनार्दन बंडा,मधुकर पाटील, मुख्य परीचारीका नीलम केळकर, रेखा मगदूम, सुनिता म्हात्रे, नीता शिवकर,नंदा उबाळे, सुषमा म्हात्रे, उज्वला निकाळजे, लक्ष्मी कोळी, कोयना पाटील, सायली ठाकूर, निवास कांबळे, नारायण भोसले, मेरोलीन कोळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात डॉ. हिंगोराणी, डॉ. राठोड, डॉ. केळकर, सुरेश पाटील, रविंद्र पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. भारतीय मजदूर संघातर्फे संपूर्ण देशात सिस्टर दिन साजरा केला जात आहे. सिस्टर आपला जीव धोक्यात घालून पेशंटची सेवा करीत आहेत. त्या एक प्रकारच्या देवदूतच आहेत. त्यांनी अशीच अविरत सेवा करावी अशा शुभेच्छा सर्वांनी त्यांना दिल्या.



## उपविभागीय अधिकारी, माणगांव विभाग माणगाांव यांजकडून

# शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूस/कात-२/एसआर-६०/२०११ दुरुस्ती, उप विभागीय अधिकारी माणगांव, विभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/ उविअमा/भूस/कात-२/जावटे/६०, अन्वये मौजे : जावटे, ता.माणगांव, जिल्हा : रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम ३२ (२) ची अधिसूचना स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१४ व २०१५ रोजी प्रसिद्ध झालेल्या आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण ६, दिनांक १९ फेब्रुवारी २०१९ च्या अधिसुचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०१८/ (३६९)/उद्योग -१४ दिनांक ६ एप्रिल, २०२१ अन्वये मौजे : जावटे, ता.माणगांव, जि.रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसुचनेतील काही सर्व्हे नंबर मधील क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार ब पृष्ठ क्रमांक ०५-०७ मध्ये दिनांक ६ एप्रिल २०२१ रोजी जाहीर केले आहे.

त्याअर्थी, स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१४ व २०१५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या कलम ३२ (२) ची अधिसुचनेत खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**

**जिल्हा : रायगड, ता.माणगांव, गांव : जावटे**

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| स.नं./ गट नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | स.नं./ गट नं. | स.नं./ गट नं. | स.नं./ गट नं. |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| ९ | २ अ | १.००७ | ९ | २ अ | १.००८ |
| १३ | ५/९/८ ड | ०.१२० | १३ | ५/९/८ ड | ०.१२९ |
| १७ | १/६ | ०.०३३ | १७ | १/६ | ०.०२३ |
| २० | १ | १.६५८ | २० | १ | ०.०४५ |
| २३ | १ क | ०.०१० | २३ | १ क | ०.४८३ |
| २३ | १ ड | ०.४८३ | २३ | १ ड | ०.०१० |
| ३० | १ अ | ०.१६० | ३० | १ अ पै | ०.१३० |
| ३० | ३ अ | ०.०३० | ३० | ३ अ पै | ०.०२८ |
| ३० | ३ ब | ०.१६३ | ३० | ३ ब पै | ०.१०१ |
| ३१ | २ | ०.०५३ | ३१ | २ पै | ०.०२३ |
| ३१ | ३ | ०.०१३ | ३१ | ३ पै | ०.००३ |
| ३२ | १ अ+३ | ०.६९४ | ३२ | १ अ+३ पै | ०.६४९ |
| ३२ | १ ब+८ | ०.६९७ | ३२ | १ ब+८ पै | ०.६०० |
| ३२ | ४ | ०.०७० | ३२ | ४ पै | ०.०३४ |
| ४० | १६ अ पै | ०.७८० | ४० | १६ अ | ०.८८० |
| ४० | १६ इ | ०.००५ | ४० | १६ इ | ०.०१० |
| ४३ | २ अ | २.१४२ | ४३ | २ अ | १.८९० |
| ४४ | २ | ३.९०१ | ४४ | २ | २.८०० |
| ४६ | १० ग | ०.१६० | ४६ | १० ग | ०.१२० |
| ४६ | १० ज | ०.१२० | ४६ | १० ज | ०.१६० |
| | | **१२.२३९** | | | **९.१२६** |

**ठिकाण : माणगांव**
**दिनांक : /०४/२०२१**

**सही/-**
**(प्रशाली जाधव-दिघावकर)**
**उपविभागीय अधिकारी**
**माणगांव विभाग माणगांव**

**क्र.जिमाका/राअ/जाहि/२६/२०२१-२२**